# MAHARASHTRA ACT No. XXXIV OF 1960.

## AN ACT TO EXTEND THE GLANDERS AND FARCY ACT, 1899, AND THE DOURINE ACT, 1910 THROUGHOUT THE STATE OF MAHARASHTRA.

# सन १९६० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३४.

[राज्यपाल यांची संमति मिळाल्यानंतर "महाराष्ट्र सरकारच्या राजपत्रांत" तारीख ३० डिसेंबर १९६० रोजीं प्रथम (इंग्रजींत) प्रसिद्ध केलेला.]

## शेंबा व गर रोगांबाबत अधिनियम, १८९९ व ड्यूरीन रोगांबाबत अधिनियम, १९१०, हे महाराष्ट्र राज्यांत सर्वत्र लागू करण्याबाबत अधिनियम.

ज्याअर्थी, महाराष्ट्र राज्याच्या मुंबई व विदर्भ प्रदेशांत अंमलांत असलेले, शेंबा व गर रोगांबाबत अधिनियम, १८९९ व ड्यूरीन रोगांबाबत अधिनियम, १९१०, हे राज्याच्या उर्वरित भागांस लागू करणें इष्ट आहे ;

त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या अकराव्या वर्षी, याद्वारें, पुढीलप्रमाणें अधिनियम करण्यांत येत आहे :—

१. या अधिनियमास, शेंबा व गर रोगांबाबत आणि ड्यूरीन रोगांबाबत अधिनियमांची व्याप्ति वाढविण्याबाबत अधिनियम, १९६० असें म्हणावें. लघु संज्ञा.

२. या अधिनियमाच्या प्रारंभाच्या निकटपूर्वी, महाराष्ट्र राज्याच्या मुंबई व विदर्भ प्रदेशांस लागू असलेल्या पुढील अधिनियमांपैकीं म्हणजे,—

(अ) शेंबा व गर रोगांबाबत अधिनियम, १८९९, आणि

(ब) ड्यूरीन रोगांबाबत अधिनियम, १९१०,

यापैकीं प्रत्येक अधिनियम हा, याद्वारें, राज्याच्या उर्वरित भागांस लागू करण्यांत येत आहे.

सन १८९९ चा भारताचा अधिनियम क्रमांक १३, व सन १९१० चा भारताचा अधिनियम क्रमांक ५ हे महाराष्ट्र राज्याच्या उरलेल्या भागांस लागू करणें.

३. कलम २ अन्वयें लागू करण्यांत आलेला, शेंबा व गर रोगांबाबत अधिनियम, १८९९ यांत,—

(अ) कलम १, पोट-कलम (२) मधील, "भाग 'ख' राज्यांत समाविष्ट असलेल्या प्रदेशांखेरीज", या मजकुराऐवजीं, "भाग 'क' राज्यांत, महाराष्ट्र राज्यांतील हैदराबाद प्रदेशाव्यतिरिक्त समाविष्ट असलेल्या इतर प्रदेशांखेरीज", हा मजकूर दाखल करण्यांत यावा ;

(ब) कलम १४ मध्यें,—

(१) पोट-कलम (१) मधील, "कानू करण्याचा अधिकार आहे" या शब्दांऐवजीं, "राजपत्रांत प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेद्वारें नियम करण्याचा अधिकार आहे" हे शब्द दाखल करण्यांत यावेत ;

सन १८९९ चा भारताचा अधिनियम क्रमांक १३ याचीं कलमें १ व १४ यांची सुधारणा.

(२) पोट-कलम (३) ऐवजीं, पुढील पोट-कलम दाखल करण्यांत यावें:—

"(३) ह्या कलमान्वयें केलेले सर्व नियम, ते करण्यांत आल्यावर शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहासमोर तीस दिवसांहून कमी असणार नाहीं इतक्या दिवसांकरितां ठेवण्यांत आले पाहिजेत; आणि अशा रीतीनें ते ज्या अधिवेशनांत ठेवण्यांत आले असतील त्या किंवा त्याच्या लगतपुढील अधिवेशनांत राज्य विधानमंडळ त्यांत जे फेरफार करील त्या फेरफारांना असे नियम अधीन असतील आणि ते राजपत्रांत प्रसिद्ध करण्यांत आले पाहिजेत.".

सन १९१० चा भारताचा अधिनियम क्रमांक ५ याचीं कलमें १ व १४ यांची सुधारणा.

४. कलम २ अन्वयें लागू करण्यांत आलेला, डयूरीन रोगांबाबत अधिनियम, १९१० यांत,—

(अ) कलम १, पोट-कलम (२) मधील, "भाग 'ख' राज्यें खेरीज करून" या शद्बांपूर्वी, "महाराष्ट्र राज्याच्या हैदराबाद प्रदेशाव्यतिरिक्त" हे शद्ब जादा दाखल करण्यांत यावेत;

(ब) कलम १४ मध्यें,—

(१) पोट-कलम (१) मधील, "कानू करण्याचा" या शद्बांऐवजीं, "राजपत्रांत प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेद्वारें नियम करण्याचा" हे शद्ब दाखल करण्यांत यावेत;

(२) पोट-कलम (३) ऐवजीं, पुढील पोट-कलम दाखल करण्यांत यावें:—

"(३) या कलमान्वयें केलेले सर्व नियम, ते करण्यांत आल्यावर शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहासमोर तीस दिवसांहून कमी असणार नाहीं इतक्या दिवसांकरितां ठेवण्यांत आले पाहिजेत; आणि अशा रीतीनें ते ज्या अधिवेशनांत ठेवण्यांत आले असतील त्या किंवा त्याच्या लगतपुढील अधिवेशनांत राज्य विधानमंडळ त्यांत जे फेरफार करील त्या फेरफारांना असे नियम अधीन असतील व ते राजपत्रांत प्रसिद्ध करण्यांत आले पाहिजेत.".

सन १३३८ फसलीचा हैदराबाद अधिनियम क्रमांक १ रद्द करणें.

५. हैदराबाद सुर्‍हा, ग्लँडर्स, फार्सी व एपिझूटिक लिम्फँजिटिस् प्रतिबंधक अधिनियम, १३३८ फसली हा, (The Hyderabad Surrah, Glanders, Farcy and Epizootic Lymphangitis Prevention Act, 1338 F.) याद्वारें रद्द करण्यांत येत आहे:

परंतु, उपरोक्त अधिनियम अशा रीतीनें रद्द करण्यांत आल्यामुळें,—

(अ) अशा रीतीनें रद्द करण्यांत आलेल्या अधिनियमाचा अंमल किंवा तदन्वयें योग्य रीतीनें केलेली किंवा करूं दिलेली कोणतीहि गोष्ट यांस, किंवा

(ब) अशा रीतीनें रद्द करण्यांत आलेल्या त्या अधिनियमान्वयें संपादन केलेल्या कोणत्याहि हक्कांस किंवा पत्करलेल्या कोणत्याहि बंधनास किंवा जबाबदारीस, किंवा

(क) अशा रीतीनें रद्द करण्यांत आलेल्या त्या अधिनियमाविरुद्ध केलेल्या कोणत्याहि अपराधाच्या संबंधांत झालेल्या कोणत्याहि शास्तीस किंवा शिक्षेस, किंवा

(ड) उपरोक्त अशा कोणत्याहि हक्काच्या, बंधनाच्या, जबाबदारीच्या, शास्तीच्या किंवा शिक्षेच्या संबंधांतील कोणत्याहि चौकशीस, वैध कारवाईस किंवा उपाययोजनेस,

बाध येणार नाहीं ; आणि जणूं हा अधिनियम संमत झाला नव्हता असें समजून, अशी कोणतीहि चौकशी, कारवाई किंवा उपाययोजना दाखल करतां येईल, चालूं ठेवतां येईल किंवा अंमलांत आणतां येईल :

तसेंच, पूर्ववर्ति परंतुकास अधीन राहून, अशा रीतीनें रद्द करण्यांत आलेल्या अधिनियमान्वयें केलेली कोणतीहि गोष्ट किंवा उपाययोजना (यांत दिलेल्या आदेशांचा किंवा नियमांचा समावेश होतो) ही, शेंबा व गर रोगांबाबत अधिनियम, १८९९, याच्या उपबंधांशीं जेथवर विसंगत नसेल तेथवर, त्या अधिनियमाच्या तत्सम उप-बंधांनुसार केलेली गोष्ट किंवा उपाययोजना आहे असें समजलें पाहिजे, आणि ती उक्त अधिनियमान्वयें केलेल्या कोणत्याहि गोष्टीद्वारें किंवा उपाययोजनेद्वारें रद्द करण्यांत आली नसेल तर व रद्द करण्यांत येईपर्यंत अंमलांत असण्याचें चालूं राहील.

(True translation)

P. S. THORAT,
Examiner of Books and Publications, Bombay.

925

## MAHARASHTRA ACT No. XXXV OF 1960.

## THE VIDARBHA AND HYDERABAD LOCAL AUTHORITIES LAWS (MAHARASHTRA AMENDMENT) ACT, 1960.

महाराष्ट्र विधानमंडळाच्या पुढील अधिनियमास राज्यपाल यांची संमति दिनांक २६ डिसेंबर १९६० रोजीं मिळालेली असल्यामुळें तो याद्वारें सर्व लोकांच्या माहितीसाठीं प्रसिद्ध करण्यांत येत आहे :—

बी. पी. दलाल,

महाराष्ट्र सरकारचे सचिव,

विधि व न्याय विभाग.